G61/BPS202/EE/20160519

वेळ : 3 तास **गुण : 80**

विद्यार्थ्यांसाठी सूचना :

1. विभाग A वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्नांचा आहे. त्याची उत्तरे उत्तरपत्रिका / OMR Sheet वर नोंदवायची आहेत.

2. OMR Sheet वरील चार पर्यायांपैकी अचूक पर्यायाखालील वर्तुळ काळ्या पेनाने पूर्ण भरावे. वर्तुळ अर्धवट भरल्यास अथवा एका प्रश्नास जास्त वर्तुळ भरल्यास ते उत्तर चुकीचे समजले जाईल.



A B C D

उत्तराची अयोग्य नोंद



A B C D

उत्तराची योग्य नोंद

3. बहुपर्यायी प्रश्नांमध्ये सर्वात अचूक उत्तरे नोंदविणे अपेक्षित आहे.

4. विभाग B वस्तुनिष्ठ विनापर्यायी स्वरूपाचा आहे. त्यासाठी स्वतंत्र उत्तरपत्रिका दिली आहे.

5. SY BA साठी उणे पद्धत लागू नाही.

SECTION - A (गुण : 40)

या विभागात एकूण 80 प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नाला अर्धा गुण याप्रमाणे हा विभाग 40 गुणांचा आहे. या विभागाला उणे गुण पद्धत लागू नाही.

1. 'वेल्थ ऑफ नेशन्स' या पुस्तकाचे लेखक कोण?
   a) ॲडम स्मिथ
   b) थॉमस माल्थस
   c) जे. एस्. मिल
   d) डेव्हिड रिकार्डो

2. जागतिक व्यापार संघटनेची स्थापना कोणत्या साली झाली?
   a) 1986 b) 1995
   c) 1947 d) 1955

3. आंतरराष्ट्रीय व्यापाराचे आधुनिक प्रमेय हा दर्जा कोणत्या प्रतिमानास प्राप्त झाला?
   a) मिल प्रतिमान
   b) हेक्सचर–ओहलिन प्रतिमान
   c) लिऑन्टिफ प्रतिमान
   d) यांपैकी नाही

4. व्यापारवाद्यांना कोणत्या दोन गोष्टींमध्ये फरक करता आला नाही?
   a) संपत्ती व खजिना b) संपत्ती व पैसा
   c) खजिना व पैसा d) पत व संपत्ती

5. आशियाई विकास बँकेची स्थापना कोठे झाली?
   a) बाली b) नवी दिल्ली
   c) सिंगापूर d) मनिला

6. सार्क संघटनेच्या स्थापनेच्या वेळी भारताचे पंतप्रधान कोण होते?
   a) इंदिरा गांधी b) राजीव गांधी
   c) व्ही. पी. सिंग d) पी. व्ही. नरसिंह राव

7. डंकेल करारानुसार कशाची स्थापना झाली?
   a) जागतिक व्यापार संघटना
   b) गॅट करार
   c) आशियाई विकास बँक
   d) सार्क

8. अंक्टाड (UNCTAD) ची बैठक किती वर्षातून होते?
   a) दरवर्षी b) दर तीन वर्षांनी
   c) दर पाच वर्षांनी d) दर दहा वर्षांनी

9. आंतरराष्ट्रीय विकास संघटना (इंटरनॅशनल डेव्हलपमेंट असोसिएशन) च्या स्थापनेसाठी कोणी पुढाकार घेतला?
   a) जागतिक बँक b) आंतरराष्ट्रीय नाणेनिधी
   c) संयुक्त राष्ट्र संघटना d) यांपैकी नाही

10. एकूण आंतरराष्ट्रीय व्यापारात युरोपियन राष्ट्रांचा वाटा किती टक्के आहे?
    a) 50% b) 55%
    c) 60% d) 65%

11. गॅटची आठवी फेरी कोठे पार पडली?
    a) उरूग्वे b) लिमा
    c) पॅरिस d) वॉशिंग्टन

12. सुवर्ण नाणी पद्धत (गोल्ड कॉइन स्टॅण्डर्ड) या पद्धतीचा वापर कोणत्या देशात केला जात होता?
    a) अमेरिका b) इंग्लंड
    c) इटली d) जर्मनी

13. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या कार्यकारी मंडळावर कोणत्या देशाचे प्रतिनिधी नसतात?
    a) जर्मनी b) भारत
    c) चीन d) इंग्लंड

14. एस्. डी. आर्. च्या निर्मिती व वाटपावर कोणत्या देशाची मक्तेदारी असते?
    a) जपान b) फ्रान्स
    c) इंग्लंड d) अमेरिका

15. जागतिक बँकेमध्ये सदस्य देशांना आपल्या वर्गणीच्या किती टक्के वाटा सोने किंवा डॉलरच्या स्वरूपात द्यावा लागतो?
    a) 5% b) 10%
    c) 15% d) 20%

16. जागतिक व्यापार संघटनेच्या नव्या करारानुसार सदस्य राष्ट्रांना आपल्या कृषी उत्पादन मूल्याच्या किती टक्क्यांपर्यंत अंशदान देण्यात येते?
    a) 10% b) 20%
    c) 30% d) 40%

17. 2011 च्या जनगणनेनुसार 0 ते 6 वयोगटाचे लिंग गुणोत्तर किती?

a) 920 b) 933

c) 940 d) 914

18. मानवी हक्कांच्या वैश्विक जाहीरनाम्यानुसार कलम 15 हे ---- शी संबंधित आहे.

a) प्रत्येक व्यक्तीस राष्ट्रीयत्वाचा अधिकार आहे.

b) प्रत्येक व्यक्तीस राष्ट्रीयत्व बदलण्याचा अधिकार आहे

c) a व b दोन्ही

d) वरीलपैकी नाही

19. मानवी हक्कांच्या वैश्विक जाहीरनाम्यातील कोणते कलम शिक्षणाच्या अधिकारासंबंधी आहे.

a) कलम 20 b) कलम 21

c) कलम 26 d) कलम 24

20. आंतरराष्ट्रीय मानवी हक्क दिवस कधी साजरा होतो?

a) 10 डिसेंबर b) 22 एप्रिल

c) 1 नोव्हेंबर d) यांपैकी नाही

21. केंद्रीय आरोग्य शिक्षण शाखा (सेंट्रल हेल्थ एज्युकेशन ब्यूरो) कोठे आहे?

a) मुंबई b) चेन्नई

c) हैद्राबाद d) नवी दिल्ली

22. राजीव गांधी राष्ट्रीय युवक विकास संस्था कोठे आहे?

a) चेन्नई b) श्रीपेरंबूर

c) मदुराई d) सर्व

23. एन सी सी चे ब्रीदवाक्य?

a) राष्ट्रीय एकात्मता b) शिस्त

c) एकता आणि शिस्त d) वरील सर्व

24. राष्ट्रीय शिक्षण संशोधन आणि प्रशिक्षण परिषद कोणते उपक्रम राबवते?

1) संशोधन 2) विकास

3) प्रशिक्षण 4) प्रकाशन

a) वरील सर्व b) 1, 2

c) 3, 4 d) 2, 3

25. राष्ट्रीय एड्स नियंत्रण कार्यक्रम कधीपासून सुरू झाला?

a) 1986 b) 1976

c) 2000 d) 2015

26. संपूर्ण स्वच्छता कार्यक्रम (---) देशातील जिल्ह्यांमध्ये कोणत्या पंचवार्षिक योजनेनुसार राबवला गेला?

a) 11 व्या b) 10 व्या

c) 9 व्या d) 12 व्या

27. कुष्ठरोग दिवस कधी साजरा केला जातो?

a) 12 जानेवारी b) 30 जानेवारी

c) 15 मार्च d) 30 मार्च

28. राष्ट्रीय अंधत्व निवारण कार्यक्रमानुसार बालकांना कोणते जीवनसत्त्व दिले जाते?

a) अ b) ब

c) क d) ब-12

29. एन् ए. आर् आय् (नॅशनल एड्स रिसर्च इन्स्टिट्यूट) कोठे कार्यरत आहे?

a) पुणे b) मुंबई

c) नागपूर d) नाशिक

30. एड्सग्रस्त लोकसंख्येत भारताचा कितवा क्रमांक आहे?

a) पहिला b) दुसरा

c) चौथा d) पंधरावा

31. स्थानिक स्वराज्य संस्थेचा जनक कोणाला म्हणतात?

a) महात्मा गांधी b) लॉर्ड रिपन

c) लॉड मेयो d) लॉर्ड बेंटिक

32. महाराष्ट्रात कोणत्या साली पंचायतराज व्यवस्था अस्तित्वात आली?

a) 1961 b) 1962

c) 1993 d) 1994

33. 72 व्या घटनादुरूस्तीनुसार कोणत्या कलमामध्ये ग्रामीण रस्त्यांचा कार्यक्रम स्थानिक स्वराज्य संस्थांनी करावा असे नमूद केले आहे?

a) 243 जी b) 243 एम्

c) 243 पी d) 243 इ

34. महाराष्ट्र शासनाच्या कोणत्या उपयुक्त ई-गव्हर्नन्स उपक्रमाला पुरस्कार मिळाला?

a) शासन b) सेतू

c) सरिता d) सारथी

35. स्वच्छ आणि शुद्ध पिण्याचे पाणी हा प्रत्येक गटाचा हक्क आहे – हे कोणत्या योजनेचे उद्दिष्ट आहे?

a) स्वजलधारा b) शीतलजल

c) जलस्वराज्य d) वरील सर्व

36. यू जी सी (युनिव्हर्सिटी ग्रॅण्ट कमिशन) विद्यापीठ अनुदान आयोगाची स्थापना केव्हा झाली?

a) 1953 b) 1954

c) 1963 d) 1964

37. सर्वाधिक घनता असलेले राज्य कोणते?

a) पश्चिम बंगाल b) बिहार

c) केरळ d) महाराष्ट्र

38. जागतिक लोकसंख्या दिन कोणता?

a) 11 जुलै b) 11 जुन

c) 11 मे d) 11 एप्रिल

39. जागतिक ग्राहक दिन कधी असतो?

a) 16 मार्च b) 15 मार्च

c) 14 मार्च d) 13 मार्च

40. आंतरराष्ट्रीय योग दिन कधी असतो?

a) 21 जुन b) 22 जुन

c) 26 जुन d) 23 जुन

41. देशातील पहिले वाय फाय गाव कोणते?

a) पाचगाव b) नायगाव

c) आंबेगाव d) सर्व

42. राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाची स्थापना केव्हा झाली?

a) 1993 b) 1994

c) 1883 d) 1882

43. जागतिक अपंग दिन कधी असतो?

a) 19 डिसेंबर b) 9 नोव्हेंबर

c) 9 डिसेंबर d) 19 नोव्हेंबर

44. जागतिक व्यापार संघटनेचा अफगाणिस्तान कितवा सदस्य आहे?

a) 165 b) 164

c) 1966 d) 1962

45. भारतीय रिजर्व बँकेचे गव्हर्नर?

a) रघुराज रामन b) रघुराम राजन

c) रघुवेंद्र रामन d) राजन रघुराम

46. राज्यातील ज्येष्ठ नागरिकांसाठीची वयोमर्यादा किती?

a) 66 वर्षे b) 65 वर्षे

c) 60 वर्षे d) 75 वर्षे

47. वेल्थ ऑफ नेशन्स हे पुस्तक कोणी लिहिले?

a) डेव्हिड रिकार्डो b) थॉमस माल्थस

c) ॲडम स्मिथ d) वरीलपैकी नाही

48. भारताचा सर्वाधिक व्यापार कोणत्या देशाशी आहे?

a) UAE b) USA

c) चीन d) UK

49. रिकार्डो यांच्या मते ––– चे उत्पादन देखील श्रमाच्या मदतीने करता येते.

a) भांडवल b) जमीन

c) व्यवस्थापन d) वरील सर्व

50. आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या निर्यात ––––– खर्चाची भूमिका देखील महत्त्वाची असते.

a) वाहतूक b) उत्पादन

c) पुरवठा d) वरील सर्व

51. ––– रोजी भारतीय रूपया पूर्ण परिवर्तनीय करण्यात आला.

a) 1994 b) 1975

c) 1974 d) 1999

52. गॅटच्या कितव्या फेरीला उरूग्वे राऊंड असे म्हणतात?

a) दुसऱ्या b) चौथ्या

c) आठव्या d) दहाव्या

53. ब्रेटनवूड जुळ्या असे नामाभिधान कोणत्या संस्थांना देण्यात आले?

a) IMF, WTO b) IMF, IBRD

c) WTO, WHO d) यांपैकी नाही

54. भारताने आर्थिक सुधारणांचे 'खाऊजा' हे धोरण कधी सुरू केले?

a) 1981 b) 1982

c) 1991 d) 1992

55. आर् बी आय् ची स्थापना कधी झाली?

a) 1931 b) 1935

c) 1950 d) 1993

56. बाराव्या पंचवार्षिक योजनेचा कालावधी कोणता?

a) 1997-2002 b) 2012-2017

c) 1950-1956 d) 2012-2018

57. हरित क्रांतीचे जनक कोण?

a) डॉ. व्हर्गीस कुरियन b) स्वामीनाथन्

c) जवाहरलाल नेहरू d) यांपैकी नाही

58. नीलक्रांती कशाशी संबंधित होती?

a) समुद्रमार्ग व्यापार b) मत्स्य उत्पादन

c) अवकाश संशोधन d) नील उत्पादन

59. अर्थसंकल्प कोण सादर करतो?

a) पंतप्रधान b) राष्ट्रपती

c) अर्थमंत्री d) यांपैकी नाही

60. एफ् डी आय् म्हणजे काय?

a) Fundamental Development Index

b) Finance Division of India

c) Foreign Direct Investment

d) Fix Deposit Insurance

61. 'आशा' कोणत्या खात्याशी संबंधित आहे?

a) शिक्षण b) आरोग्य

c) अर्थव्यवस्था d) पर्यावरण

62. सध्याचे अर्थमंत्री कोण?

a) अरूण जेटली b) चिदंबरम्

c) स्मृती इराणी d) वरीलपैकी नाही

63. डंकेल करार ––––– मध्ये करण्यात आला.

a) 1995 b) 1998

c) 1999 d) 1950

64. जागतिक व्यापार संघटनेची स्थापना ––––– यांच्या प्रस्तावावर आधारित आहे.

a) डंकेल b) टोकियो

c) केनेडी d) यांपैकी नाही

65. राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाच्या अध्यक्षपदी नुकतीच कोणाची नियुक्ती करण्यात आली?

a) न्या. बालकृष्णन्

b) शरदचंद्र सिन्हा

c) न्या. एच्. एल्. दत्तू

d) पी.एल्. पुनिया

66. सुवर्णक्रांतीचा (गोल्डन रेव्होल्यूशन) संबंध ––– आहे.

a) अन्न उत्पादनाशी

b) दुग्ध पालनाशी

c) मधुमक्षिका पालनाशी

d) वरीलपैकी नाही

67. भारताची अर्थव्यवस्था –––– प्रकारची आहे.

a) मिश्र b) संमिश्र

c) भांडवल d) वरील सर्व

68. स्वतंत्र भारताचे पहिले अर्थमंत्री कोण?

a) षण्मुखानंद चेट्टी b) सी. डी. देशमुख

c) मनमोहन सिंग d) डॉ. आंबेडकर

69. नारी ही संस्था कशाशी संबंधित आहे?

a) कॅन्सर b) कुष्ठरोग

c) एड्स d) क्षयरोग

70. अकराव्या पंचवार्षिक योजनेनुसार –––– एवढ्या साक्षरता दराचे उद्दिष्ट ठेवलेले आहे.

a) 75% b) 70%

c) 80% d) 85%

71. लक्ष्मीबाई राष्ट्रीय शारीरिक शिक्षण संस्थेचे ईशान्य भारतातील कार्यालय कोठे आहे?

a) गुवाहाटी b) दार्जिलिंग

c) दिसपूर d) यांपैकी नाही

72. पल्स पोलिओ कार्यक्रमाची सुरूवात कधी झाली?

a) 1995 b) 1996

c) 1997 d) 1975

73. WHO ची स्थापना कधी झाली?

a) 1948 b) 1995

c) 1997 d) 1975

74. सामुदायिक विकास योजना भारत सरकारने केव्हा सुरू केली?

a) 2 ऑक्टोबर, 1952

b) 2 नोव्हेंबर, 1952

c) 2 ऑक्टोबर, 1954

d) 2 नोव्हेंबर, 1954

75. भारत निर्माण योजना केव्हा सुरू करण्यात आली?

a) 16 मे, 2005

b) 17 मे, 2006

c) 2 ऑक्टोबर 1954

d) 2 नोव्हेंबर, 1954

76. नाबार्डची स्थापना केव्हा झाली?

a) 1982 b) 1993

c) 1935 d) 1985

77. संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान यांच्याद्वारे चांगली कामगिरी करणाऱ्या ग्रामपंचायतींना कोणता पुरस्कार दिला जातो?

a) संत गाडगेबाबा स्वच्छता पुरस्कार

b) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज पुरस्कार

c) महात्मा गांधी स्वच्छता पुरस्कार

d) वरीलपैकी नाही

78. सर्व शिक्षण अभियान कधीपासून अस्तित्वात आले?

a) 2001 b) 2009

c) 2005 d) 2016

79. मनरेगा ही योजना कशासाठी आहे?

a) आरोग्य b) शिक्षण

c) रोजगार d) यांपैकी नाही

80. जागतिक बँक कोणत्या प्रकारची कर्जे देते?

a) अल्पकालीन

b) दीर्घकालीन

c) दोन्ही

d) दोन्ही नाही

SECTION - B (गुण : 40)

या विभागात एकूण 40 प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नाला एक गुण याप्रमाणे हा विभाग 40 गुणांचा आहे. या विभागाला उणे गुण पद्धत लागू नाही.

1. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना कोणामार्फत राबविण्यात येते?

2. SBI ची स्थापना केव्हा झाली?

3. CRR म्हणजे ------.

4. SLR म्हणजे ----.

5. IDBI चे संक्षिप्त स्वरूप

6. भारत कोणत्या वस्तूंची सर्वाधिक आयात करतो?

7. भारत कोणत्या वस्तूंची सर्वाधिक निर्यात करतो?

8. एस् डी आर् कोणामार्फत प्रचलित केले जातात?

9. FEMA कायदा केव्हा संमत करण्यात आला?

10. घटनेत बजेटला काय म्हणून संबोधले जाते?

11. पहिली भू विकास बँक कोणत्या राज्यात स्थापन करण्यात आली?

12. IMF म्हणजे ----.

13. IDA म्हणजे ------.

14. राशीपतन (Dumping) म्हणजे काय?

15. भारतात कोणत्या क्षेत्रात 100% परकीय प्रत्यक्ष गुंतवणूक संमत करण्यात आलेली नाही?

16. सध्याचे महाराष्ट्राचे शालेय मंत्री कोण?

17. GATT चे संपूर्ण नांव सांगा.

18. राष्ट्रीय ग्राहक दिन केव्हा असतो?

19. ADB म्हणजे ----.

20. SAARC म्हणजे ----.

21. NCERT म्हणजे ----.

22. WHO म्हणजे ----.

23. भारतीय रूपया कोणत्या खात्यावर पूर्ण परिवर्तनिय आहे?

24. निती आयोगाचे अध्यक्ष कोण?

25. अर्थसंकल्प केव्हा सादर केला जातो?

26. सर्वाधिक साक्षरता कोणत्या राज्यामध्ये आहे?

27. सर्वाधिक लोकसंख्या घनता असलेले केंद्राशासित प्रदेश कोणता?

28. सर्वात कमी साक्षरता असलेले महाराष्ट्रातील जिल्हे कोणते?

29. FEMA म्हणजे -------.

30. लोकसभेत अर्थसंकल्प कोण सादर करतो?

31. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचे मुख्यालय कोठे आहे?

32. बलवंतराय मेहता समिती कोणत्या साली स्थापन करण्यात आली होती?

33. ASHA चे विस्तृत रूप लिहा.

34. परकीय भांडवल म्हणजे काय?

35. राष्ट्रीय उत्पन्न म्हणजे काय?

36. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीची रचना ---- स्वरूपाची आहे.

37. SDF म्हणजे ----.

38. LIC म्हणजे ------.

39. कोणत्या घटनादुरूस्तीने स्थानिक स्वराज्य संस्थांना घटनात्मक दर्जा प्राप्त झाला आहे.

40. महाराष्ट्रातील साक्षर व पर्यटन जिल्हा कोणता?

